## शहा माणिकलाल हिराचंद

| | |
|---|---|
| Maniklal Hirachand Shah | नाव : माणिकलाल हिराचंद शहा<br>जन्मतारीख : ११ एप्रिल १९५१<br>शिक्षण : बी.ई.(सिव्हील), First Class with distinction<br>शासन सेवेतील कालावधी : केंद्र शासनाकडे 3 वर्षे (1973 -1976)<br>महाराष्ट्रन शासनाकडे 32 वर्षे 6 महिने<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन<br>येथून ‘सचिव’ पदावरुन एप्रिल 2009 अखेर सेवानिवृत्त. |

### अनुभव

राज्ये शासनाकडे, सार्वजनिक बांधकाम विभागात, 15.11.1976 रोजी सहाय्यक अभियंता (वर्ग-1) म्हणून नेमणूक झाली. (एम.पी.एस.सी. स्पर्धात्मक परिक्षेद्वारे नेमणूक)
सहाय्यक अभियंता (वर्ग-1), कार्यकारी अभियंता, अधिक्षक अभियंता, मुख्यय अभियंता व सचिव म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध शाखांमध्ये (जसे की सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ, राष्ट्रीय महामार्गाचे काम, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कार्यालयीन कामकाज / मंत्रालयीन कामकाज इ.) अशा प्रकारचे काम केले.
महाराष्ट्रातील विविध ठिकाणी जसे की सातारा, पुणे, अहमदनगर, सोलापूर, धुळे, नांदेड, मुंबई येथे काम केले.
शासकीय इमारतींची नवीन बांधकामे, रस्ते-पुलांची नवीन कामे, B.O.T. ची कामे, तसेच इमारती, रस्ते व पुलांची देखभाल व दुरुस्तीची कामे यांचा गाढा अनुभव आहे.
कामांचे नियोजन करणे, अर्थसंकल्पीय व योजनेत्तर कार्यक्रमांचे प्रस्ताव तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देणे, प्रारुप निविदा मसुदा प्रपत्रे मंजुर करणे, कामांची अंमलबजावणी करणे, कामांचे गुणनियंत्रण करणे, बजेटींगचे काम, बाह्य अर्थसहाय्यातून हाती घ्यावयाच्या कामांचे प्रस्ताव तयार करणे, आस्थातपनाविषयक कामे, भांडार हाताळणीचे काम अशी विविध प्रकारची कामे केली. प्रकल्प अहवाल चांगल्या प्रकारे तयार केले.
रस्ते सुरक्षिततेबाबत जनसामान्यांचे प्रबोधन करणे व अभियांत्रिकी स्वरुपाच्या सुधारणा करणेचे उद्दीष्ट ठरवून, रस्ते सुरक्षितता मोहीमा राबविण्यारत आल्या.
आपत्कालीन परिस्थिती (भूकंप, पूर हानी वगैरे) स्थायपत्य अभियांत्रिकेशी संबंधित कामे तत्परतेने केली. तसे वेळोवेळी आपत्कालीन व्यवस्था पन आराखडे तयार केले.
लातूर, किल्लारी परिसरात झालेल्या भूकंपाच्या वेळेस भूकंपग्रस्तांपना तात्पुपरते निवास पुरविण्यापची, शासनाने दिलेली जबाबदारी सक्षमरित्या हाताळली.
कामे करताना नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञान आणि कार्यपध्द्ती आत्मसात करुन त्याचा उपयोग केला. संगणक प्रणाली शिकून त्याचा वापर केला. सॉफ्टवेअरचा वापर करण्यायसाठी हाताखालील कर्मचा-यांना प्रवृत्त केले. सार्वजनिक बांधकाम विभागाची विविध माहिती वेबसाईटवर अद्ययावत उपलब्ध करुन दिली.
कामगारांचे प्रश्न, कंत्राटदारांचे दावे, अतिक्रमणे काढणे यासारखे संवदेनशील प्रश्न यशस्वीरित्या हाताळले.
न्यायालयीन प्रकरणी (कामगारांची, कंत्राटविषयक, चौकशीप्रकरणी, सेवाविषयक बाबी संबंधी वगैरे) परिच्छेंदनिहाय समर्पक उत्तरे तयार करुन सनियंत्रण केले. बरीच न्यायालयीन प्रकरणे निकाली निघाली. विविध स्तरावर न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा अनुभव आहे. लवादांचीही प्रकरणे हाताळली.
सर्वसामान्ये जनतेची गा-हाणी / तक्रारी ऐकून घेऊन त्यांचे प्रभावीपणे निराकरण केले.
वरीलप्रमाणे विविध प्रकरणे हाताळण्यानसाठी लेखाविषयक ज्ञान, विविध कायद्यांचे ज्ञान, आस्थायपनविषयीचे ज्ञान, सामान्य ज्ञान, प्राप्त केले.
वर्ग-1, वर्ग-2 अधिका-यांविरुध्दच्या विभागीय चौकशी प्रकरणांमध्ये ‘चौकशी अधिकारी’ म्हणणून कामकाज केले व चौकशी अहवाल शासनास सादर केले.

विविध समित्यांसवर सदस्य म्हणून, अध्यक्ष म्हणून काम केले व समितीचे अहवाल शासनास सादर केले,(अ) विमान धावपट्टयांच्या देखभाल दुरुस्तीचे निकष ठरविणे, (ब) पावसाळयांत रस्यांणून वर पडणा-या खड्डयांची कारणमिमांसा शोधणे व उपाययोजना सुचविणे. (क) अतिवृष्टीमुळे हानी झालेल्यां पुलांचा अभ्यास करणे व उच्चस्तरीय पुलांसाठी संरचनात्मक उपाय योजना सुचविणे, अशा तांत्रिक समित्यांवर, तसेच विभागाची / उपविभागाची कार्यभार ठरविणे, अशा प्रशासकीय स्वरुपाच्या समित्यांवर तसेच मल्टीप्लेक्स इमारतींमध्ये सुरक्षिततेच्यात दृष्टीने उपाययोजना सुचविणे, स्टील सिमेंटच्या दरामध्ये अवाजवी स्वरूपाची वाढ झाल्यामुळे कंत्राटाच्या भाववाढ कलमात सुधारणा सुचविणे अशा विविध समित्यांवर काम केले.
सा.बां.मंडळ व विभागीय कार्यालयासाठी I.S.O. 9001-2000 प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली.

Last Updated on Thursday, 23 May 2013 11:24